अतारांकित प्रश्नोत्तरांची ४ थी यादी

# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### ठाणे जिल्ह्यातील तब्बल ९३ हेक्टर कांदळवन क्षेत्र नष्ट झाल्याबाबत

**(१) ३९ (२६-०४-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील तब्बल ९३ हेक्टर कांदळवन क्षेत्र सन २०२१ ते २०२३ या तीन वर्षांत नष्ट झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांदळवन नष्ट केल्यामुळे त्याचा पर्यावरणीय समतोलावर व समुद्राच्या जैविक विविधतेवर विपरित परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कांदळवनांच्या संरक्षणासाठी तसेच नष्ट होण्यास कारणीभूत गोष्टींचा तपास करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (०२-०७-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

भारतीय वन सर्व्हेक्षण अहवाल २०२३ मध्ये प्रकाशित केलेल्या माहितीनुसार महाराष्ट्र राज्यातील सागरी जिल्ह्यातील कांदळवन वृक्ष आच्छादन (Mangrove Tree Cover) चे क्षेत्रात सन २०२१ च्या तुलनेत सन २०२३ मध्ये १२३९ हे. इतकी वाढ झालेली आहे. तथापि, ठाणे, मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यात अनुक्रमे ९३ हे., ३ हे., व १८ हे. कांदळवन वृक्ष आच्छादन कमी झाल्याचे प्रकाशित झाले आहे.

(२) हे खरे नाही.

ठाणे जिल्ह्यामध्ये वनसंवर्धन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत कांदळवन क्षेत्रामध्ये ८४.१२७ हे. इतके क्षेत्र वळतीकरण करण्यात आलेले आहे. सदर वळतीकरणाच्या अनुषंगाने प्राप्त पर्यायी वनीकरण क्षेत्राव्यतिरिक्त राज्यातील तटीय जिल्ह्यामध्ये मागील ४ वर्षांत एकूण ४०८.२६ हे क्षेत्रावर कांदळवनाचे वनीकरण (Plantation) करण्यात आले आहे. त्यामुळे पर्यावरणीय समतोलावर व समुद्राच्या जैविक विविधतेवर परिणाम झाला असे म्हणणे संयुक्तीक होणार नाही.

(३) सन २०२१ ते २०२३ या २ वर्षांच्या कालावधीत ठाणे जिल्ह्यातील कांदळवन क्षेत्रे नष्ट करुन अतिक्रमण (४.२५२६ हे.) करणाऱ्या विरुध्द भारतीय वन अधिनियम, १९२७ मधील तरतुदीनुसार एकूण १४ वनगुन्हे नोंद करुन कार्यवाही केली आहे. त्याचप्रमाणे कांदळवनाचे संरक्षण व संवर्धनार्थ क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी व महाराष्ट्र सुरक्षा बल (MFS) यांच्या समवेत वेळोवेळी गस्त करण्यात येते तसेच कांदळवना संदर्भात तक्रारींचे निराकरण करण्यासाठी मॅग्रोव्ह सुरक्षा ॲप सन २०२४ मध्ये कार्यन्वीत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील 'प्रति थेंब अधिक पीक" सूक्ष्म सिंचन योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळण्याबाबत**

**(२) १५५ (२६-०४-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील "प्रति थेंब अधिक पीक" सूक्ष्म सिंचन योजनेच्या लाभापासून एक लाखांहून अधिक शेतकऱ्यांना वंचित राहावे लागत असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे सन २०२३-२४ मध्ये १.७७ लाख शेतकऱ्यांचे ७१६ कोटींचे अनुदान प्रलंबित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रलंबित अनुदानामुळे या योजनेच्या अंमलबजावणीवर परिणाम झाल्याने निधी अभावी बहुतांश शेतकऱ्यांना अनुदान मिळाले नसून नवीन अर्जदारांना लाभ देता येईल की नाही, असाही प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना अनुदान प्राप्त होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (०१-०७-२०२५) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. सदर योजनेत निधीची तरतूद केंद्र व राज्य हिस्सा ६०:४० टक्के प्रमाणात आहे.

सन २०२३-२४ च्या प्रलंबित दायित्वाकरिता सर्वसाधारण प्रवर्ग रु.६९८.३७, अनुसूचित जाती रु.५४.६८ व अनुसूचित जमाती रु.४२.६० कोटी असे एकूण रू. ७९५.६५ कोटी इतका निधी सन २०२४-२५ मध्ये वितरीत करण्यात आला आहे.

सन २०२५-२६ मध्ये रु.५०४.८३ कोटी (केंद्र व राज्य हिस्सा) इतका निधी अर्थसंकल्पित केला असून त्यापैकी रु.२५१.४२ कोटी निधी वितरित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड व परभणी जिल्ह्यात स्वयंचलित हवामान यंत्रे चुकीच्या पध्दतीने नोंदी घेत असल्याबाबत**

**(३) ५८३ (२६-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड व परभणी जिल्ह्यात पिकांच्या नुकसानीच्या नोंदी घेण्यासाठी स्वयंचलित हवामान यंत्रे बसविण्यात आले असून या यंत्राची अनेक वर्षांपासून देखभाल दुरुस्तीच करण्यात आली नसल्यामुळे चुकीच्या पध्दतीने नोंदी घेत असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरमान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, वातावरणात झालेल्या बदलामुळे स्वयंचलित हवामान यंत्रे चुकीची नोंद घेत असल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीपिकांचे नुकसान होऊनही त्यांना विमा कंपनीकडून पिक विमा नाकारला जात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्वयंचलित हवामान केंद्राची तत्काळ तपासणी करुन त्यातील तांत्रिक दोष दूर करुन पुन्हा कार्यान्वित करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन स्वयंचलित हवामान यंत्राची देखभाल दुरुस्ती तातडीने करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (०७-०७-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

कृषि व पदुम विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.राकृवि.०६१६/ प्र.क्र.७४/राकृवियो कक्ष दिनांक ०८ मार्च २०१७ अन्वये राज्यात महावेध प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. महावेध प्रकल्पांतर्गत नांदेड जिल्ह्यात ८९ व परभणी जिल्ह्यामध्ये ५२ स्वयंचलित हवामान केंद्रे स्थापित केली आहेत. सदर सर्व स्वयंचलित हवामान केंद्र सद्य:स्थितीत चांगल्या प्रकारे देखभाल केलेली आहेत आणि कार्यरत स्थितीत आहेत. या हवामान केंद्रांच्या देखभाल आणि तपासणीसंदर्भातील कार्यवाही नियमितपणे केली जाते.

नांदेड जिल्ह्यात, पुनर्रचित हवामान आधारीत फळपिक विमा योजनेंतर्गत, मृग बहार २०२४ मध्ये मोसंबी पिकाकरिता हवामान धोके लागू न झाल्यामुळे नुकसान भरपाई निरंक आहे. परभणी जिल्ह्यात, उक्त योजनेअंतर्गत, मोसंबी, सिताफळ, पेरू, लिंबू, व संत्र या फळपिकांकरिता पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याची कार्यवाही विमा कंपनीस्तरावर सुरु आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पनवेल - उरण तालुक्यातील सिडको हद्दीत वास्तव्य करित असलेल्या झोपडपट्टी वासियांच्या पुनर्वसनाबाबत

**(४) ७८२ (०१-०५-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल-उरण तालुक्यातील सिडको हद्दीतील वर्षानुवर्षे अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टी वासियांच्या झोपड्या कायमस्वरूपी करण्याबाबत निश्चित धोरण नसल्यामुळे झोपडपट्टी वासियांच्या पुनर्वसनाचा प्रश्न अद्यापही प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिडको प्रशासनाच्या उदासिन धोरणामुळे गेल्या अनेक वर्षापासून वास्तव्य करित असलेल्या झोपडपट्टी वासियांच्या झोपड्या अनधिकृत ठरवून सिडको प्रशासन नागरिकांना बेघर करत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पनवेल - उरण तालुक्यातील सिडको हद्दीतील गेल्या अनेक वर्षापासून वास्तव्य करित असलेल्या झोपडपट्टी वासियांच्या पुनर्वसनाबाबत निश्चित धोरण आखण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०५-२०२५) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार सिडको महामंडळाची नवी मुंबई प्रकल्पासाठी "नवनगर विकास प्राधिकरण" म्हणून नियुक्ती केली आहे व त्याकरीता ठाणे, पनवेल व उरण तालुक्यातील एकूण ९५ गावे अधिसूचित केली आहेत. नवी मुंबई प्रकल्प या सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित केलेल्या जमिनींवरील अतिक्रमणाच्या नियमितीकरणासंदर्भात

किंवा पुनर्वसनासंदर्भात नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारित) नियमावली, २००८ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मध्ये अतिक्रमण नियमितीकरणासंदर्भात कोणतीही तरतुद नाही.

सदरच्या जमिनी / क्षेत्र नवी मुंबई प्रकल्पाच्या विकासासाठी आवश्यक असल्याने सिडको हद्दीतील बेकायदेशीर / अनधिकृत बांधकामांवर सिडकोमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदींनुसार विहीत पध्दतीने कारवाई करण्यात येते. त्यामुळे अशी अनधिकृत बांधकामे / झोपडपट्टी वासियांचा पुनर्वसनाचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई स्थित सिडको महामंडळाने विविध नोडमधील घरांचे जाहिर केलेले दर सामान्यांच्या आवाक्याबाहेर असल्याबाबत

**(५) ९११ (२७-०४-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोने निर्माणाधीन ६७ हजार घरांपैकी विविध नोडमधील २६ हजार घरांच्या किंमती दिनांक ७ जानेवारी २०२५ रोजी रात्री सोशल मिडियावर आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्न गटासाठी जाहीर केलेल्या घरांच्या किंमती सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको महामंडळाने विविध नोडमध्ये २६ हजार घरांची सोडत प्रक्रियेतील घरांचे दर जाहीर केल्यानंतर तळोजातील घरे प्रदूषण आणि पाण्याच्या समस्येमुळे विक्री होत नसल्याने सिडको मंडळाने २६ हजारांच्या घरांच्या सोडत प्रक्रियेत तळोजातील विविध श्रेणीतील १०,५१८ घरे विक्रीसाठी काढली, हे खरे आहे काय?

(३) असल्यास, ज्या घरांची किमती ७४ लाख आहे अशांना ७९ लाख ५८ हजार आणि ९७ लाख रुपयांचे घर असणाऱ्यांना एक कोटी ४ लाख रुपये मोजावे लागणार तसेच प्रत्येक इमारतीच्या सहाव्या मजल्यावरील घरासाठी अधिकचे १० रुपये चौरस फुटामागे आकारले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सिडकोची घरे बाजारभावातील खासगी विकासकापेक्षा सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दराने विक्री करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०५-२०२५) :** (१) व (२) सिडकोने जाहीर केलेल्या गृहनिर्माण योजनेतील घरांच्या किंमती दिनांक ७.१.२०२५ रोजी जाहीर केलेल्या आहेत. या योजनेतील घरांच्या किंमती ह्या बाजारभावाच्या किंमती, सिडकोचे किंमत निश्चितीचे धोरण व सर्वसामान्यांची आर्थिक क्षमता लक्षात घेऊन निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

सिडकोने माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये जाहीर केलेल्या २५,७२३ घरांच्या गृहनिर्माण योजनेत तळोजा येथील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) मधील ९,६९४ घरे व अल्प उत्पन्न गटातील (LIG) ८२४ घरे अशाप्रकारे एकूण १०,५१८ घरांचा समावेश होता. घरांच्या किंमती जाहीर झाल्यानंतर तळोजा येथील घरांचा समावेश योजनेत केलेला नाही.

(३) सिडकोने जाहीर केलेल्या घराच्या किंमतीवर शासनाच्या धोरणानुसार निश्चित करण्यात आलेली Stamp Duty, LBT, Metro Cess व Registration Charges ची रक्कम वेगळ्याने अदा करावी लागणार आहे. तसेच, अल्प उत्पन्न गटासाठी ६ वा मजला व त्यावरील घरांसाठी प्रत्येक चौ.फुटासाठी रु.१०/- एवढी रक्कम मजला वाढ (Floor Rise) म्हणून निश्चित करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामरोजगार सेवकांच्या मागण्यांची पूर्तता करण्याबाबत**

**(६) १०२३ (२५-०४-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत पंचायत समितीने कार्यरत ग्रामरोजगार सेवकांनी शासन निर्णय दिनांक ३ जानेवारी, २०२४ नुसार कर्मचाऱ्यांना रू.८०००/- दरमहा मानधन लागू करणे, पूर्णवेळ कर्मचारी म्हणून मान्यता देणे तसेच त्यांच्या खात्यात मानधनाची रक्कम जमा करणे अशा मागण्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार सेवक संघटना (चंद्रपूर) यांनी शासनाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागण्यांच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधी यांनी मा.रोजगार हमी योजना मंत्री महोदयांना दिनांक ११ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (२७-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामीण पातळीवर कार्यरत ग्रामरोजगार सहाय्यक यांना प्रतिमाह रू.८०००/- सुधारित मानधन व इतर अनुषंगिक भत्ते देण्यासंदर्भात दिनांक ०३.१०.२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी नवीन लेखाशिर्ष उघडण्यास वित्त विभागाने मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगिक अर्थसंकल्पीय तरतूद करण्याची बाब विभागाकडून कार्यवाहीत आहे.

शासनाच्या दिनांक ३१.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये ग्रामरोजगार सहाय्यकांना प्रचलित पद्धतीने मानधन अदा करण्याच्या सूचना आयुक्त कार्यालय, नागपूर यांना दिल्या असून त्यानुसार मानधन अदा करण्यात आलेले आहे.
४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राहुरी (जि.अहिल्यानगर) येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठात अनागोंदी कारभार होत असल्याबाबत**

**(७) ११७९ (२६-०४-२०२५). श्री.शिवाजी कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहुरी (जि.अहिल्यानगर) येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठात कर्मचाऱ्यांच्या विविध विभागातील बदल्या नियमबाह्य करुन पद:स्थापना व पदोन्नत्या करणे, अनेक अत्याधुनिक व किंमती उपकरणे धुळखात असणे, दरवर्षी नियमबाह्य साहित्य खरेदी करणे, विद्यापीठातील बांधकामे तसेच देखभाल दुरुस्तीची कामे मर्जीतील ठेकेदारांनाच देणे व ठेकेदारांची बिले अदा करणे इ. अनागोंदी कारभार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) त्याचबरोबर देश-विदेशातील विविध अभ्यास दौऱ्यांसाठी होतकरु व संशोधनाची आवड असणाऱ्या अनेक कृषी संशोधकांना प्राधान्य न देता मर्जीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्राधान्य दिल्याने अनेक कृषी संशोधकांची निराशा होऊन काही वर्षांपासून संशोधनात्मक पातळीवर विद्यापीठाचे अपयश दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (२७-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही

"महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९८३ व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परिनियम, १९९० अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार कुलगुरु यांचे मान्यतेने कृषि विद्यापीठातील अधिकारी / कर्मचारी यांच्या बदल्या करण्यात येतात. तसेच, महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परिनियम, १९९० मधील परिनियम, ७५ (१) व ७६ तसेच महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील अधिनियम, ५८ (१) अन्वये गठीत करण्यात आलेल्या निवड मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार आणि परिनियमातील प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येते.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध कार्यालये / संशोधन योजना / केंद्र / प्रकल्प यांचेकरीता आवश्यक असणारे साहित्य, उपकरणे व इतर साहित्य यांचा आवश्यक त्या लेखासंहितेचा अवलंब करुन खरेदी करण्यात आलेल्या आहेत, सदर खरेदी केलेले सर्व साहित्य व उपकरणे हे गरजेनुसार वापरण्यात येतात.
(२) हे खरे नाही,

भारतीय कृषी अनुसंधान परिषद-राष्ट्रीय कृषी उच्च शिक्षण प्रकल्प, नवी दिल्लीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करत संपूर्ण पारदर्शक प्रक्रिया राबवून या विद्यापीठाने ९७ विद्यार्थी, ३१ प्राध्यापक/शास्त्रज्ञ यांना आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणासाठी व ११ विद्यापीठ अधिकारी यांना अभ्यास दौऱ्यासाठी पाठविण्यात आले होते.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील शासकीय आदिवासी वसतीगृहातील विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांबाबत

**(८) १३८२ (२६-०४-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील शासकीय आदिवासी मुला-मुलींच्या वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी विविध मागण्यांसाठी आदिवासी प्रकल्प कार्यालयासमोर दिनांक १६ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास ठिय्या आंदोलन सुरु केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आंदोलनास आठ दिवस उलटूनही त्याकडे दुर्लक्ष झाले तसेच कडाक्याच्या थंडीने अनेक विद्यार्थी व विद्यार्थीनींची प्रकृती बिघडल्याने त्यांना उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास नेण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांच्या सदर मागण्या मान्य करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (३०-०६-२०२५) :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही, सदर आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांशी प्रकल्प अधिकारी, पांढरकवडा यांनी चर्चा करुन समस्या जाणून घेतल्या व आंदोलन मागे घेणे बाबत आव्हान करण्यात आले होते, तथापि विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे न घेतल्याने सदरच्या आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांची रात्रीच्या मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय पथकाकडून आंदोलनकर्ते विद्यार्थ्यांची आंदोलन संपेपर्यंत दररोज नियमीत आरोग्याची तपासणी करण्यात येत होती.
(३) विद्यार्थ्यांच्या मागणीतील शासकीय वसतीगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या वसतीगृह डी.बी.टी. रकमेत वाढ करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात स्व. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत**

**(९) १३८५ (२५-०४-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जागतिक बँकेच्या सहकार्याने सन २०२०-२१ मध्ये स्व.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) या प्रकल्पाचे काम अत्यंत संथगतीने सुरु असल्याने जागतिक बँकेने राज्याचे मुख्य सचिव यांना पत्र पाठवून आक्षेप घेतल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेंतर्गत अर्थसहाय्य, हिस्सा व खासगी उद्योग क्षेत्राच्या कार्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) मधून निधी उपलब्ध असूनही प्रकल्पाची अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रकल्पात गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (३०-०६-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
जागतिक बँकेने दिनांक १०.०९.२०२४ च्या पत्रान्वये सन २०२४-२५ मध्ये नियोजित आर्थिक तरतूद न केल्याबाबत नमूद करुन तातडीने निधी वितरित करण्याबाबत व सुधारीत तरतूद करण्याबाबत सूचित केले होते.
(२) व (३) हे खरे नाही.
स्मार्ट प्रकल्पासाठी ३.३३% (निधी (१० दशलक्ष यु.एस.डॉलर्स) खाजगी क्षेत्राचा सहभाग म्हणून CSR निधीतून VSTF च्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे. त्यापैकी आतापर्यंत ०.६ मिलीनियम डॉलर (अंदाजित ४.३० कोटी) इतका निधी उपलब्ध झाला आहे. उर्वरित निधी उपलब्ध करुन देणेबाबत VSTF कडे पाठपुरावा करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मानखुर्द-बेलापूर या रेल्वे प्रकल्पात सानपाडा व दत्तगुरु झोपडपट्टीतील विस्थापितांची पात्रता निश्चित करुन घरे देण्याबाबत

**(१०) १४२५ (०१-०५-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द-बेलापूर या रेल्वे प्रकल्पात सानपाडा व दत्तगुरु झोपडपट्टी सिडकोच्या जागेवर असून सदरची झोपडपट्टी दिनांक १७ मे, १९९४ रोजी वा त्यासुमारास निष्कासित करण्यात आली, मात्र विस्थापितांना अद्याप घरे देण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात मा.उच्च न्यायालयाने सुनावणी घेऊन विस्तापितांना घरे देण्याचे अंतिम आदेश दिनांक १४ मे, २०१३ रोजी वा त्यासुमारास आदेश निर्गमित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव (नवि-१) नगरविकास विभाग यांच्याकडे प्रकल्पग्रस्तांची दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली व सदरच्या बैठकीमध्ये १७० विस्तापितांपैकी ४५ विस्तापितांना घरे देण्याचे आदेश शासनाने सिडको महामंडळाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उर्वरित १२५ विस्तापितांची पात्रता निश्चित करुन त्यांच्या नावे घरे देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०५-२०२५) :** (१), (२), (३) व (४) सिडको महामंडळाच्या जागेवर अनधिकृतपणे वास्तव्यास असलेली सानपाडा येथील मानखुर्द-बेलापूर रेल्वे मार्गावरील दत्तगुरुनगर झोपडपट्टी दिनांक १७.५.१९९४ रोजी निष्कासित करण्यात आली होती. सदर झोपडपट्टीधारकास सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र.८८०५, दिनांक १३.८.२००३ व ठराव क्र.१०२२०, दिनांक २३.११.२००९ अन्वये २५ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड विहित दराने देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

दरम्यान दत्तगुरुनगर सानपाडा प्रकल्पग्रस्त यांचे प्रवर्तकातर्फे मा.उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र.६६३४/२०१२ मधील दिनांक २३.७.२०१२ च्या आदेशाच्या अनुषंगाने तत्कालीन प्रधान सचिव (नवि-१) यांचेकडे सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीअंती दिनांक १४.५.२०१३ रोजीच्या आदेशानुसार सिडकोच्या ठरावान्वये पुनर्वसनास मान्यता दिलेल्या एकूण १२९ विस्थापितांच्या यादीमध्ये ८४ विस्थापितांचा समावेश असल्याने उर्वरित ४५ विस्थापितांची पात्रता तपासून सिडकोने निर्णय घ्यावा, असे निर्देश देण्यात आले होते. तसेच, प्रधान सचिव (नवि-१) यांचेकडे सिडकोचे संबंधित अधिकारी व प्रकल्पग्रस्तांसोबत दिनांक २४.११.२०२३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या अनुषंगाने उक्त निर्देशानुसार संबंधितांना नोटीसा देऊन कागदपत्रांची तपासणी करून उर्वरित पात्रताधारक / विस्थापितांची यादी निश्चित करण्यास पुनश्च: सिडको महामंडळास कळविण्यात आले आहे. सिडको महामंडळामार्फत कागदपत्रे सादर करण्यासाठी जाहीर सूचना दिनांक १३.१२.२०२३, दिनांक ४.१.२०२४ व दिनांक २४.२.२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

सद्य:स्थितीत, रेल्वे प्रकल्पबाधीत विस्थापितांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी सिडको स्तरावर अंतिम टप्प्यात असून पुढील दोन महिन्यांत यासंदर्भात अंतिम निर्णय घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात विशेषतः नागपूरात असणाऱ्या हलबा व हलबी समाजाच्या समस्या सोडविण्याकरीता घटना दुरुस्तीची शिफारस केंद्र शासनास करण्याबाबत

**(११) १५३४ (२६-०४-२०२५). श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषतः नागपूरात असणाऱ्या हलबा या अनुसूचित जमाती प्रवर्गातील नागरिकांची विणकर व्यवसाय अवलंबल्यामुळे कोष्टी नोंद झाली असून यासंदर्भात हलबा घटना दुरुस्तीची शिफारस केंद्र शासनाकडे पाठविण्याबाबत मा.उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत दिनांक १२ डिसेंबर, २०२३ रोजी हिवाळी अधिवेशनात नागपूर येथे बैठक झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बैठकीत मा.उपमुख्यमंत्री यांनी दिलेल्या निदेशानुसार अनुसूचित जमाती मधील हलबा व हलबी कोष्टी समाजाच्या घटना दुरुस्तीसाठी राज्य शासनाने केंद्र शासनाला अद्यापही शिफारस केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात अहवाल सादर करण्याबाबत दिनांक २८ ऑगस्ट, २०२४ च्या पत्राद्वारे आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे यांना विनंती करुनही अद्याप अहवाल सादर झाला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, घटना दुरुस्तीसाठी केंद्र शासनाला शिफारस करण्याबाबत मा.केंद्रीय महामार्ग विकास मंत्री तथा अन्य लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी लेखी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन हलबा व हलबी समाजाच्या समस्या सोडविण्याकरीता घटना दुरुस्तीची शिफारस केंद्र शासनास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (०१-०७-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) आयुक्त,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून दिनांक २०.०९.२०२४ रोजी यासंदर्भातील अहवाल शासनास प्राप्त झाला आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) हलबा कोष्टी या जमातीचा अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये समावेश करण्याबाबत यापूर्वी दिनांक १३ सप्टेंबर, १९६७ व दिनांक १२ जून, १९७९ च्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आली होती. तथापि, केंद्र शासनाने दिनांक २६ फेब्रुवारी, १९८१ च्या पत्रान्वये अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये समावेश करण्यासाठी निर्धारित केलेल्या निकषांची पूर्तता होत नसल्याने दिनांक ०६.११.१९८१ च्या पत्रान्वये सदर प्रस्ताव मागे घेण्यात आलेला होता. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने त्यांच्या अहवालामध्ये हलबा, हलबी या अनुसूचित जमातीचे निकष कोष्टी हलबा या जातीसाठी लागू होत नसल्यामूळे कोष्टी हलबा व हलबा-हलबी या दोन भिन्न जाती व अनुसूचित जमाती आहे असे नमूद केले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा व लातूर जिल्ह्यात शेतकऱ्यांना माती परिक्षणाचे अहवाल प्राप्त होण्याबाबत

**(१२) १६६४ (२५-०४-२०२५). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात कृषी विभागाच्यावतीने एका हेक्टर शेतामधील एक यानुसार मातीचे नमुने माती परिक्षणाकरिता पाठविण्यात आले असूनही त्यांचा अहवाल मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच लातूर जिल्ह्यात शेतीसाठी रासायनिक खतांचा वापर गरजेपुरताच करण्याकरीता माती परिक्षण करणे अत्यंत गरजेचे असून हंगामाच्या कालावधीत अहवाल येत नसल्याने शेतकऱ्यांची अडचण होत असून शेतीचा खर्च वाढल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रासायनिक खतांच्या वाढत्या वापरामुळे शेत जमिनीचा पोत बिघडत असून उत्पन्नात वाढ होत असतानाही माती परिक्षणाचा अहवाल मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना माती परिक्षणाचे अहवाल तात्काळ उपलब्ध होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (२०-०६-२०२५) :** (१) बुलढाणा जिल्हा मृद सर्व्हेक्षण व मृद चाचणी प्रयोगशाळेस एकूण १८५०० लक्षांक असुन वैयक्तिक शेतकरी व योजना मिळून एकूण १८९८० मृद नमुने प्राप्त झाले आहेत. त्यापैकी १८९८० मृद नमुने विश्लेषित केले असून १८५८० आरोग्य पत्रिका शेतकऱ्यांना वितरीत केल्या आहेत. उर्वीरित ४०० वैयक्तिक शेतकऱ्यांना आरोग्य पत्रिका वितरणाचे काम सुरू आहे.

(२), (३), व (४) कृषी आयुक्तालयाने दिलेल्या अहवालानुसार लातूर जिल्ह्यामध्ये सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत जमीन आरोग्य व सुपीकता कार्यक्रमामध्ये खरीप हंगामात ६४४० नमुने व रब्बी हंगामात २७६० मृद नमुने असे एकूण ९२०० मृद नमुने तपासणीचे लक्षांक आरोग्य पत्रिका वितरणाचे काम १००% पूर्ण झालेले आहे.

केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मोबाईल ॲप द्वारे शेतकऱ्यांचे नमुने घेत असल्यामुळे क्षेत्रीय स्तरावर नमुना घेताना मोबाईल ॲप व नेटवर्क या तांत्रिक बाबींमुळे काहीवेळा अडचणी निर्माण होतात, तथापि या अडचणी तात्काळ सोडवणेबाबत प्रयत्न केला जातो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोपनहेगन (डेन्मार्क) विद्यापीठातून एका संशोधनाद्वारे मिळालेल्या माहितीतून राज्यात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाल्याबाबत

**(१३) १६६५ (२५-०४-२०२५). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपनहेगन (डेन्मार्क) विद्यापीठातून एका संशोधनाद्वारे मिळालेल्या माहितीतून राज्यात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या माहितीनुसार शासनास यासंदर्भात माहिती मिळाली आहे काय, तसेच राज्यात किती प्रमाणात व कोणत्या कारणांकरिता वृक्षतोड करण्यात आली आहे,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (०३-०७-२०२५) :** (१), (२) व (३) कोपनहेगन (डेन्मार्क) विद्यापीठातून एका संशोधनाव्दारे मिळालेल्या माहितीतून राज्यात मोठया प्रमाणात वृक्षतोड झाल्याचे द हिंदू दैनिकात दिनांक १८.०५.२०२४ रोजी बातमी प्रकाशित झाली आहे.

महाराष्ट्र राज्यात मुख्यत: मालकी क्षेत्रात विनापरवानगीने सन २०२३ -२४ पर्यंत १५५६९ ऐवढी वृक्षतोड झालेली आहे.

महाराष्ट्र राज्यात वनविभागामार्फत विनापरवानगी केलेल्या वृक्षतोड प्रकरणी सन सन २०२३-२४ पर्यंत विनापरवानगीने वृक्षतोड प्रकरणात २८,७२,७३७/- रूपये दंड आकारण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याबाबत**

**(१४) २००६ (०१-०५-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याबाबत दिनांक २३ सप्टेंबर, २०२४ रोजी झालेल्या शासन निर्णयाची त्वरीत अंमलबजावणी करण्याबाबत सिडकोला तातडीने निर्देश देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.|मुख्यमंत्री व नगरविकास मंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको प्रशासनाने प्रकल्प उभारताना ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील ९५ गावातील जमिनी संपादित करताना मुळ गावठाणाच्या हद्दी कायम करून भविष्यातील ग्रामस्थांची नैसर्गिक वाढ लक्षात घेऊन गावठाण विस्तार योजना पूर्ण न केल्यामुळे प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांनी त्यांचे कुटूंबाच्या नैसर्गिक वाढीपोटी गावठाणालगत रहिवास उदरनिर्वाहाकरिता बांधकामे केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार पाठपुरावा केल्यानंतर शासनाने दिनांक २३ सप्टेंबर, २०२४ रोजी प्रकल्पग्रस्तांची गरजेपोटी बांधलेली घरे/बांधकामे नियमित करण्याचा निर्णय देऊन जवळपास ५ ते ६ महिन्याचा कालावधी होऊनुसध्दा सिडको प्रशासनाने शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०५-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेल्या घरांच्या नियमितीकरणासंदर्भात शासन निर्णय दिनांक २३.९.२०२४ अन्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

गरजेपोटी बांधकामांतर्गत येणा-या संभाव्य कृती क्षेत्राच्या सर्व्हेक्षणाकामी सिडकोमार्फत निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर निविदेची तांत्रिक बोली (निविदा) व वित्तीय बोली (निविदा) छाननी करुन त्यास सिडको संचालक मंडळाची मान्यता प्राप्त असून कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

दरम्यान, मा.उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र.८०/२०१३ मधील अंतरिम आदेशानुसार अनधिकृत बांधकामाखालील क्षेत्राच्या नियमितीकरण धोरणाची अंमलबजावणी करण्यापुर्वी मा.उच्च न्यायालयाची अनुमती घेणे आवश्यक असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील कार्यरत मंडळ अधिकारी यांच्या कार्यालयीन रेकॉर्डची चौकशी करण्याबाबत

**(१५) २०६५ (२९-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यात कार्यरत मंडळ अधिकारी श्रीमती स्मिती देशमुख यांनी तलाठी पदावर कार्यरत असताना वाटणी पत्रांच्या नोंदी मोठ्या प्रमाणात बाँडवर घेऊन शासनाच्या महसूलाचे नुकसान केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मंडळ अधिकारी, पाटोदा यांच्या तलाठी पदावरील नियुक्तीपासून ते मंडळ अधिकारी या पदावरील संपूर्ण कार्यालयीन रेकॉर्डची चौकशी करून कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई. यांच्याकडे दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२८-०५-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २६.११.२०२४ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने, मंडळ अधिकारी, पाटोदा, ता.अंबाजोगाई, जि.बीड यांची संपूर्ण कार्यालयीन रेकार्डची चौकशी करण्याकरिता तहसिलदार, अंबाजोगाई यांचे दिनांक १९.१२.२०२४ रोजीच्या आदेशान्वये, नायब तहसीलदार यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर चौकशीत प्राथमिकरित्या दिनांक ०१.०७.२०२१ ते आजरोजीपर्यंत मंडळ अधिकारी या पदावरील अभिलेखाची तपासणी केली असता ८३ बाँड पेपरवर वाटणी पत्रांच्या आधारे नोंदी घेऊन बेकायदेशिर कृत्य केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार मंडळ अधिकारी, पाटोदा यांचेविरूध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती येथील कोळी महादेव बांधवांना अनुसूचित जातीचे जातवैधता प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**(१६) २१४२ (२६-०४-२०२५). श्री.रवी राणा (बडनेरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील उपसचिव, आदिवासी विकास विभाग यांना लोकप्रतिनिधी यांनी विभागीय आयुक्त कार्यालयाचे अप्पर आयुक्त, सामान्य प्रशासन विभागाने पाठविलेल्या कोळी महादेव बांधवांना अनुसूचित जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र सुलभरित्या मिळण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २४ ऑक्टोबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने पाठपुरावा करणारे श्री.उमेश म.ढोणे, महासचिव महाराष्ट्र राज्य कृती समिती यांनी कोळी महादेव बांधवांना अनुसूचित जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र सुलभरीत्या मिळण्यासाठी शासनाने निर्णय घेण्याकरिता लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास संबंधित विभागास व मा.मुख्यमंत्री महोदयांना मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्र पाठविल्यानुसार मुख्यमंत्री कार्यालयाकडून दिनांक ५ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास दुपारी तीन वाजताच्या दरम्यान ई-मेलद्वारे आदिवासी विकास विभागाच्या सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना आवश्यक त्या कारवाईचे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त मागणीनुसार अनुसूचित जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र सुलभरित्या मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (३०-०६-२०२५) :** (१), (२) व (३) होय.
(४) अनुसूचित जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र सुलभरित्या मिळण्याच्या दृष्टीने, मा.राष्ट्रपती यांच्या मान्यतेने "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २३)" व महाराष्ट्र शासनाने सदर अधिनियमाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ पारित केले आहेत.
सदर अधिनियम व नियमातील तरतुदींनुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व अनुसूचित जमातींसाठी जातवैधता प्रमाणपत्र देण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यासह भिवंडी तलाठी यांच्या प्रलंबित मागण्याची पूर्तता करण्याबाबत

**(१७) २२११ (२९-०४-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्राम महसूल यांच्या कामात विविध अडचणी येत असून त्या कामामध्ये शासनाकडून दुरुस्ती होण्याबाबतचे निवेदन महाराष्ट्र राज्य तलाठी संघ, शाखा भिवंडी, यांच्याकडून तहसिलदार भिवंडी यांना दिनांक ४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, तलाठी पदाचे नामांतर ग्राम महसूल अधिकारी झाल्याने, सेवार्थ आयडी तयार करणे, सेवा पुस्तिका अद्यावत करण्यासाठी विशेष शिबीर आयोजित करणे, आश्वासित प्रगती योजनेत असलेल्या त्रुटीचे निराकरण करणे, नवीन ग्राम महसूल अधिकारी कार्यालय इमारत बांधणे तसेच नवीन ई-ऑफीस प्रणाली सुरु करण्यात आल्याने कार्यालयीन कामकाजाकरीता नवीन लॅपटॉप, प्रिंटर व स्कॅनर उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी केली आहे,
(३) तसेच सामाईक खात्यामध्ये नाव कमी करणे किंवा समाविष्ट करणे, मंडळ अधिकारी यांना Reentry सुविधा उपलब्ध करणे, ७/१२ बंद करुन नवीन पोट हिस्सा तयार करणे, फेरफार घेताना तांत्रिक अडचणी येत असल्याने त्या समस्याचे निराकरण तलाठी स्तरावर करणे, दुय्यम निबंधक लॉगिनला शेतकरी पुराव्याचा उल्लेख् करण्याबाबत, कर्जासंदर्भात आय-सरीता प्रणालीमध्ये दुरुस्ती करणे ,तसेच तलाठी लॉगिनचे ई-फेरफार मधील सर्व अहवाल लॉगिनला घेणे अशा अनेक मागण्या केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाकडून कार्यप्रणालीत बदल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२८-०५-२०२५) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) महाराष्ट्र राज्य तलाठी संघ, शाखा भिवंडी, यांचेकडून तहसीलदार भिवंडी यांना दिनांक ४ जानेवारी, २०२५ रोजी दिलेल्या निवेदनातील काही मागण्या ह्या जिल्हाधिकारी स्तरावरील असून काही मागण्या ह्या तांत्रिक स्वरूपाच्या आहेत. त्या तपासून त्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या कार्यालयाकडून एकूण ६७ पदे सेवार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट करुन मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला होता. सदर प्रस्तावातील ३ पदे रिक्त असून १ पदावरील अधिकारी निलंबित असल्यामुळे एकूण ६३ पदे सेवार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. "सेवापुस्तक पडताळणी कॅम्पचे" आयोजन करणेबाबत तसेच सदर कॅम्पला कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी उपस्थित राहून सेवापुस्तकातील १ ते १२ बाबींची पूर्तता आहे अगर कसे? याची पडताळणी करणेबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक २७/०२/२०२५ च्या पत्रान्वये संबंधित उपविभागीय/तहसील कार्यालय यांना सूचना दिल्या आहेत. ३४ तलाठी कर्मचाऱ्यांना यापूर्वी कालबध्द पदोन्नती योजना व सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. उर्वरित तलाठी कर्मचारी यांना नियमानुसार आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. भिवंडी, जि.ठाणे येथे ३० तलाठी कार्यालयाचे बांधकामास महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक २७.६.२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

---

## कुंडलवाडी (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील परडी- ७ मधील मुळ क्षेत्रफळात अफरातफर केल्याबाबत

**(१८) २३३७ (३०-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुंडलवाडी (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील परडी ७ मधील मूळ क्षेत्रफळात फेरफार करून अनधिकृतपणे रक्कम उचलल्याबाबत श्री.जायेवार शंकर नागनाथ यांनी दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ रोजी ई-मेलद्वारे व दिनांक ४ जुलै, २०२४ रोजी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी नांदेड यांच्या निदर्शनास आणून दिले असून सदर क्षेत्रफळाची पुन:श्च मोजणी करण्याबाबतची मागणी त्यांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारी अर्जावर त्वरित चौकशी करून नियमानुसार कार्यवाही करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे दिनांक ७ ऑक्टोबर, २०२४ व दिनांक ११ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०७-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) मौजे कुंडलवाडी, ता.बिलोली येथील परडी-७ मधील मूळ क्षेत्रफळात अफरातफर करून अनधिकृत रक्कम उचल केल्याबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसीलदार, बिलोली यांनी सुनावणी घेऊन दिनांक २५ एप्रिल, २०२५

रोजी आदेश पारित केले असून यान्वये तक्रारीमध्ये तत्थ्य नसल्याचा निष्कर्ष काढून तक्रारकर्त्याचा अर्ज फेटाळून प्रकरण निकाली काढलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अक्कलकुवा व धडगाव (जि.नंदुरबार) तालुक्यात वनपट्टेधारकांना वनपट्टे मिळण्याबाबत

**(१९) २५६६ (२६-०४-२०२५). श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अक्कलकुवा व धडगाव (जि.नंदुरबार) तालुक्यात शेकडो वनपट्टेधारकांनी वनपट्टे मिळविण्यासाठी अनेक वर्षांपासून प्रस्ताव तहसील कार्यालय, प्रांत अधिकारी कार्यालयाकडे सादर केला असूनही अद्याप वनपट्ट्यांचे वाटप करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त प्रस्तावांना तातडीने मंजूरी देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (२७-०६-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.
माहे मे, २०२५ अखेर अक्कलकुवा तालुक्यातील प्राप्त १५०५३ दाव्यांपैकी ८६०८ वैयक्तिक दावे मंजूर करण्यात आली असून १५५७ दावे नामंजूर करण्यात आली आहेत. तर धडगाव तालुक्यातील प्राप्त १५४५४ दाव्यांपैकी १०२७० वैयक्तिक दावे मंजूर करण्यात आली असून १००५ दावे नामंजूर करण्यात आली आहेत. उर्वरित दाव्यांबाबत जिल्हास्तरिय, उपविभागस्तरिय व ग्रामस्तरिय वनहक्क समित्यांमार्फत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नंदुरबार जिल्ह्यातील अनेक शासकीय आदिवासी आश्रमशाळेत शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत

**(२०) २५६८ (२६-०४-२०२५). श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्ह्यातील अनेक शासकीय आदिवासी आश्रमशाळेत शिक्षकांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आश्रमशाळेतील रिक्त जागांवर शिक्षकांची नियुक्ती करण्यात न आल्यामुळे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून आदिवासी विद्यार्थी वंचित राहून मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन आश्रमशाळेतील शिक्षकांची पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (३०-०६-२०२५) :** (१) अशंत: खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

पेसा संवर्गातील पदभरतीच्या अनुषंगाने बिगर आदिवासी आरक्षण हक्क बचाव संस्थेने मा.न्यायालयात आव्हान दिलेले आहे. त्यानुसार, पेसा क्षेत्रातील विहित करण्यात आलेल्या १७ संवर्गात पदभरतीच्या अनुषंगाने निवडप्रक्रिया / नियुक्तीसंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात येवू नये, अशा सूचना सामान्य प्रशासन विभागाने सर्व संबंधित विभागांना दिल्या आहेत. तथापि, शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊन नये म्हणून प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्या स्तरावरून सदर रिक्त जागांवर तासिका तत्वावर शिक्षकांच्या अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## देवमोगरा (ता.अक्कलकुवा जि.नंदुरबार) गावातील नागरिकांना पुनर्वसनासाठी शेती देण्यात आल्याबाबत

**(२१) २६३३ (२५-०४-२०२५). श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्ह्यातील सरदार सरोवर प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात प्रकल्पबाधित झालेल्या शेतकऱ्यांना देवमोगरा (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) येथे पुनर्वसन करण्यासाठी शेती देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शेतीत सिंचनाची सोय करण्यासाठी सरदार सरोवर प्रकल्पामार्फत स्वेच्छा सिंचन योजना राबविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत ५२ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला असून शेतकऱ्यांना पूर्ण सिंचनाची सोय करुन देण्याचे आश्वासन देऊन संबंधित ठेकेदाराने उक्त शेतकऱ्यांच्या खात्यावरील संपूर्ण रक्कम काढून त्यांना सिंचनाची सोय उपलब्ध करुन दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) (०२-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) ५१ प्रकल्पबाधित लाभार्थ्यांना स्वेच्छा सिंचन योजने अंतर्गतचे अनुदान धनादेशाद्वारे त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आले आहे हे खरे आहे.

स्वेच्छा सिंचन सुविधा योजनेंतर्गत पुनर्वसन गावठाण क्र.५ देवमोगरानगर ता.अक्कलकुवा जि.नंदुरबार येथील सरदार सरोवर प्रकल्पबाधित २७८ शेतक-याना रु.२,४५,०००/- प्रमाणे अनुदान मंजुर केलेले आहे. देवमोगरा शिवारातील २७८ प्रकल्पबाधितांच्या बँक खात्यामध्ये अनुअदानाचे ९०% रक्कम रु. २,२०,५००/- प्रमाणे धनादेश द्वारे वर्ग करण्यात आले आहे. उर्वरित १०% अनुदानाची रक्कम कुपनलिकेचे काम पूर्ण झाल्यावर पाणी उपलब्धता बाबतचे भुजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणेचे प्रमाणपत्र उपलब्ध झाल्यानंतर धनादेश द्वारे वर्ग करण्यात येते.

स्वेच्छा सिंचन सुविधे अंतर्गत कुपनलेचे खोदकाम, विद्युतपंप टाकणे, विद्युत कनेक्शन घेणे ई. काम प्रकल्प बाधिताने स्वतः करुन घ्यावयाचे आहे. या कामासाठी नर्मदा विकास विभाग, नंदुरबार कार्यालयामार्फत कोणतीही निविदा काढण्यात आलेली नाही वा कंत्राटदार नेमण्यात आलेला नाही.
(४) देवमोगरा ता.अक्कलकुवा येथील उपरोक्त २७८ प्रकल्पबाधितांपैकी ५१ प्रकल्पबाधित यांनी दिनांक २०/०७/२०२२ रोजी तक्रार दिलेली आहे. तक्रारीनुसार "सरदार सरोवर प्रकल्पांतर्गत नर्मदा विकास विभाग,

उपविभाग क्र.३ कडून स्वेच्छा सिंचन सुविधेकरिता शासनाकडून देय रक्कम रु.२,४५,५००/- पैकी रु.२,२०,५००/- अनुदान मिळाले होते. परंतु ठेकेदार श्री.अनिल साळुंके रा. साक्री यानी शेतक-यांच्या शेतात बोरवेल करुन डिमांड नोट भरुन ईलेक्ट्रीक मोटार/पाईपलाईन करुन फक्त बटन दाबुन शेतात पाणी चालु करावयाचे इतके पूर्ण करुन देईन असे सांगुन शेतक-याकडून रक्कम रु.२,२०,५००/- बँकेतून काढून मागितले" असे तक्रार मध्ये नमूद करण्यात आले आहे.

या तक्रारीच्या अनुषंगाने सहाय्यक अभियंता, श्रेणी १ नर्मदा विकास उपविभाग क्र.३ अक्कलकुवा यांनी दिनांक १९/०९/२०२२ व दिनांक २०/०९/२०२२ रोजी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली त्यावेळेस १७ प्रकल्पबाधितांचे कुपनलिका खोदकाम, विद्युत पंप बसविणे व अनुषंगिक कामे पूर्ण झालेली होती उर्वरित ३४ प्रकल्प बाधितांचे कुपनलिका खोदकाम पूर्ण होऊन इतर कामे बाकी होती.

दिनांक ३०/०६/२०२३ रोजी तत्कालीन मा.पालकमंत्री, नंदुरबार यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत सदर ५१ प्रकल्पबाधीत शेतक-याच्या तक्रारी विषयी चर्चा झाली. त्यावेळेस तत्कालीन मा.पालकमंत्री यांनी पोलिस निरिक्षक पो. ठाणे अक्कलकुवा यांना सर्व संबधीत कागदपत्र उपलब्ध करुन देण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे सहाय्यक अभियंता श्रेणी-१, नर्मदा विकास उपविभाग क्र.३ अक्कलकुवा यांनी दिनांक २८/०८/२०२३ रोजी सर्व कागद पत्र पोलीस निरिक्षक पोलिस ठाणे अक्कलकुवा यांना उपलब्ध करुन दिले होते. पोलिस निरीक्षक पोलिस ठाणे अक्कलकुवा यांचे पत्र क्र. २२१७/२०२३ दिनांक १८/०९/२०२३ चे पत्रात अनिल साळुंके रा. साक्री ता.साक्री, जि.धुळे तसेच, श्री.किससिंग हुन्या वसावे रा. देवमोगरा पुनर्वसन ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार यांनी सदर प्रकल्पबाधित शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक केलेबाबत आढळून आलेले आहे.

त्याप्रमाणे, नर्मदा विकास उपविभाग क्र.३ चे कनिष्ठ अभियंता यांनी सदर प्रकरणाबाबत अक्कलकुवा पोलिस स्टेशन, फौ.गु. रजि.नं.४९८/२०२३, दिनांक-२८/०९/२०२३ नुसार संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. तसेच, पोलीस निरीक्षक, अक्कलकुवा पोलीस ठाणे यांनी दोषारोप मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अक्कलकुवा न्यायालय, अक्कलकुवा यांचेकडे दिनांक २४/०१/२०२४ रोजी सादर केलेले असून सद्य:स्थितीत हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जत (जि.सांगली) येथील आदिवासी पारधी समाजाकरिता शबरी घरकुल योजनेंतर्गत घरकुलांसाठी सुधारित दराने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२२) २८९७ (२६-०४-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) येथील आदिवासी पारधी समाजाकरिता शबरी घरकुल योजनेंतर्गत घरकुलांसाठी शासन निर्णय दिनांक १५ फेब्रुवारी, २०१० अन्वये प्रती घरकुलासाठी रुपये एक लक्ष एवढा निधी मंजूर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार मे.साईकृपा कंन्स्ट्रक्शन, ठाणे या संस्थेने बांधकाम क्षेत्रातील अनुभव असल्याने सदर संस्थेस दिनांक २१ फेब्रुवारी, २०१२ व ८ जानेवारी, २०१३ अन्वये घरकुल बांधकामाचे आदेश निर्गमित करण्यात येवून सदर आदेशात बांधकाम टप्प्याप्रमाणे करणाऱ्या संस्थेस निधी उपलब्ध करुन देण्यात येईल असे नमूद केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ठिकाणी दिनांक ०६ जानेवारी, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार शहरी भागातील घरकुलासाठी सुधारित दराने निधी उपलब्ध न झाल्यामुळे बांधकामे अपुऱ्या स्थितीत आहेत, त्यापैकी काही घरांची पडझड झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात आदिवासी पारधी समाजाकरिता शबरी घरकुल योजनेंतर्गत घरकुलांसाठी सुधारित दराने निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (२७-०६-२०२५) :** (१), (२), (३) व (४) हे खरे आहे.
(५) आदिवासी विभागाच्या दिनांक ११.०१.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये शबरी आदिवासी घरकुल योजना शहरी भागात राबविणेकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना व अटींच्या अधीन राहून जत नगरपरिषदेकरीता मंजूर करण्यात आलेल्या ३०० घरकुलांपैकी अद्याप पर्यंत बांधकाम सुरू करण्यात न आलेल्या १०७ घरकुलांना दिनांक ३१.०३.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. उर्वरित ज्या १९३ घरकुलांची कामे जी अद्याप अर्धवट स्वरुपात आहेत, त्या घरकुलांकरीता विभागाच्या दिनांक १२.०६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित दराने उर्वरित अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाळीसगाव तालुक्यातील नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना खंड न देता नियुक्ती करण्याबाबत

**(२३) ३०३३ (२६-०४-२०२५). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव तालुक्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा २.० मध्ये दुष्काळग्रस्त २७ गावांचा समावेश करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सततच्या पावसामुळे तसेच अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या ३० ते ३५ दुष्काळग्रस्त गावांचा नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा २.० मध्ये समावेश करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन उर्वरित गावांचा समावेश करण्यासंदर्भात तसेच सद्य:स्थितीत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना टप्पा २.० मध्ये खंड न देता नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (३०-०६-२०२५) :** (१) होय.
(२) कृषी व पदुम विभागाच्या शासन निर्णय दिनांक ३०.०६.२०२३ अन्वये गठीत केलेल्या अप्पर मुख्य सचिव (कृषी) यांच्या अध्यक्षतेखालील गाव निवड समितीने निर्धारीत केलेल्या निकषांच्या आधारे प्रकल्पाच्या टप्पा-२ मध्ये मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेने राज्यातील २१ जिल्हयातील ७२०१ गावांची निवड करण्यात आली असून त्यामध्ये चाळीसगाव तालुक्यातील २७ गावांचा समावेश आहे.

(३) जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने प्रकल्पाचा टप्पा-२ राबविण्यात येणार असून, त्याकरिता आवश्यक असलेली नियमित पदे व बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध करून घ्यावयाच्या मनुष्यबळ सेवा यांना मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तर सचिव समितीने मंजूरी दिलेली असून, जागतिक बँकेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार निवडण्यात येणाऱ्या बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ सेवा (कंत्राटी सेवा) उपलब्ध करून घेण्यात येणार आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतजमिनीचे पिकपाणी लावण्यासाठी असलेल्या अटी व शर्ती शिथिल करण्याबाबत**

**(२४) ३१९५ (२४-०४-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या नियमानुसार प्रतिवर्षी करण्यात येणाऱ्या शेती (उदा. भातशेती, काजू, आंबा) यांची पिकपाणी नोंद करण्यासाठी शेतकऱ्यांना ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करून संबंधित ठिकाणाचे फोटो काढून अपलोड करणे अनिवार्य करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वच ठिकाणी नेटवर्क सुविधा उपलब्ध नसल्याने ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेत शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून बहुतांश सर्वसामान्य शेतकरी या डिजिटल प्रक्रियेमध्ये कुशल नसल्यामुळे ते शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहीले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोकणातील शेतीत दरवर्षी भातशेती व इतर हंगामी पिके घेतली जात असून मात्र काजू, आंबा व अन्य फळपिकांची लागवड एकदाच केली जाते, तरीही दरवर्षी पिकपाणी नोंदणीची अट लादण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित शेतकऱ्यांच्या नावावर शेती आहे की नाही, यांची खातरजमा महसूल खात्याद्वारे करुन तलाठी किंवा तत्सम अधिकारी यांच्यामार्फत पूर्वीप्रमाणे पीकपाणी नोंदणी प्रक्रिया राबविण्यात यावी आणि काजू, आंबा व अन्य फळपिकांसाठी वार्षिक नोंदणीची अट शिथिल करून फक्त पहिल्यांदा लागवड झाल्याची नोंद पुरेशी ठरवावी याबाबत शासनाकडून अंमलबजावणी होणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-०५-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
शासन निर्णय क्रमांक:-२०१८/प्र.क्र.९२/(भाग-१)/ ज-१ अ दिनांक ३० जुलै, २०२१ अन्वये शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांची नोंद ई- पिक पाहणी मोबाईल ॲप द्वारे शेतकऱ्यांना ऑनलाइन पद्धतीने करण्यासाठी दिनांक १५ ऑगस्ट २०२१ पासून ई-पिक पाहणी नोंदविण्याची प्रक्रिया संपूर्ण राज्यामध्ये सुरु करण्यात आलेली आहे. दिनांक १४/१०/२०२४ च्या शासन निर्णयाप्रमाणे प्रत्येक हंगामातील पहिले ४५ दिवस शेतकरी स्वत: पिक पाहणी नोंद करतात, तर नंतरचे ४५ दिवस सहाय्यक हे पीक पाहणी करतात.
(२) हे खरे नाही.
ई-पिक पाहणी मोबाईल ॲपवर केवळ नाव नोंदणी करण्यासाठी इंटरनेट सुविधा आवश्यक आहे. नाव नोंदणी ही प्रक्रिया शेतावर जाऊन करण्याची गरज नसून ती कोठेही करता येते. तसेच ही प्रक्रिया एकदाच करावी लागते. प्रत्यक्ष शेतामध्ये पिकांची नोंद करण्यासाठी इंटरनेटची आवश्यकता नाही. तसेच यासाठी ग्रामीण स्तरावर कोतवाल, ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक, आशा सेविका, ग्रामरोजगार सेवक यांचे सहकार्य उपलब्ध करून देण्यात येते.

(३) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या तरतुदीनुसार दरवर्षी दर हंगामात पिक पाहणी नोंदी करण्याचे निर्बंध घालून देण्यात आले आहेत. जी पिके संपूर्ण वर्ष शेतात असतात त्या पिकांसाठी संपूर्ण वर्ष हंगाम निवडून वर्षभरात कोणत्याही हंगामात एकदा पिक पाहणी नोंदवण्याची सुविधा दिली आहे. त्यामुळे दरवर्षी पिक पाहणी नोंद ही अट नव्याने घालण्यात आली नसल्याने, ही बाब खरी नाही.
(४) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्याने पिक पाहणी मोबाईल ॲप द्वारे करण्याचा पुरोगामी विचार देशात सर्वप्रथम केला असून राज्यात २०२१ पासून पिक पाहणी ही मोबाईल ॲप द्वारे करण्यात येत आहे. पिक पाहणी नोंदविण्याचा हक्क "माझी शेती, माझा सातबारा, मीच नोंदविणार माझा पीकपेरा" या घोषवाक्यासह राज्याने देशात प्रथमच शेतकऱ्यांना दिला आहे. राज्य शासनाच्या दिनांक १४/१०/२०२४ च्या शासन निर्णयाप्रमाणे शेतकऱ्यांसाठी दर हंगामात पहिले ४५ दिवस पिक पाहणी नोंद कालावधी निश्चित असून त्यापुढील ४५ दिवस गावातील उर्वरीत पिक पाहणी नोंदणी ही पीक पाहणी सहायकामार्फत पूर्ण करण्यात येते. मोबाईल ॲपच्या माध्यमातून पिक पाहणी नोंदवण्याच्या महाराष्ट्र राज्याच्या उपक्रमाचे कौतुक झाले असून सन २०२३ साली केंद्र शासनाच्या कृषी विभागाकडून या कार्यपद्धतीचा अंगीकार संपूर्ण देशासाठी करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. सबब, पुन:श्च महसूल खाते/तलाठी यांचेमार्फत पिक पाहणी नोंदविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयाच्या जागेसाठी कृषी विभागाकडून जागा हस्तांतरणाकरीता निधी प्रलंबित असल्याबाबत

**(२५) ३३५८ (२७-०४-२०२५) श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) लातूर जिल्ह्यात स्वतंत्र जिल्हा रुग्णालय उभारण्यास राज्याचे माजी मुख्यमंत्री यांनी निधी देखील मंजूर केला, मात्र मागील काही दिवस जिल्हा रुग्णालयास कृषी विभागाकडून जागा हस्तांतरणाचे केवळ रुपये ३,३२,६८६५० एवढे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कृषी विभागास निधी देऊन जमीन हस्तांतरीत करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (३०-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय दिनांक ०४.०२.२०१९ अन्वये वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषी महाविद्यालय, लातूर यांची सर्व्हे क्र.३७ मधील एकूण १० एकर जमीन शासकीय जिल्हा रुग्णालय, लातूर करिता सदरच्या जमिनीचा मोबदला सार्वजनिक आरोग्य विभागाने परभणी कृषी विद्यापीठ तसेच, कृषी महाविद्यालय, लातूर यांच्या विकासकामांसाठी उपलब्ध करुन देण्याच्या अटीच्या अधीन मान्यता देण्यात आली होती.

सार्वजनिक आरोग्य विभागाने सदरच्या जमिनीचा मोबदला शासन निर्णय दिनांक २८.०३.२०२५ अन्वये परभणी कृषी विद्यापीठास उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यानुषंगाने, कृषी विभागाने सदरची जमीन जिल्हा रुग्णालय, लातूर करिता हस्तांतरित करण्यासाठी महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्याची कार्यवाही केलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी पालघर जिल्ह्यातील जमिनी संपादित केलेल्या शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(२६) ३४१६ (२७-०४-२०२५). श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी पालघर जिल्ह्यातील शेतक-यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या असून त्यांना नुकसानभरपाई न देता मोठ्या प्रमाणावर झाडे तोडली जात असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने उक्त जमिनधारकांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-०५-२०२५) :** (१) व (२) पालघर जिल्ह्यातील पालघर, वसई, डहाणू व तलासरी तालुक्यातील मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी खाजगी जमीन संपादन करणेची कार्यवाही सुरु आहे.

संपादीत जमिनीवरील फळझाडे व वनझांडाचा मोबदला संबंधित शेतकऱ्यांना RTGS प्रणालीव्दारे अदा केला आहे. तसेच ज्या खातेदारांना मुल्यांकन दर मान्य नसणे, इत्यादी प्रकरणे मा. निबंधक, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण, औरंगाबाद यांच्याकडे जिल्हाधिकारी, पालघर यांनी न्यायनिर्णयासाठी पाठविले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद येथे ३५ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती अधिकाऱ्यांच्या चौकशीबाबत

**(२७) ३५८३ (२७-०४-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती सहआयुक्तां विरुद्धची अवमान प्रकरणे खंडपीठात दाखल असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही वर्षापासून नागरिकांची विविध प्रमाणपत्र प्रलंबित ठेवल्यामुळे ३५ अधिकाऱ्यांना दंडही करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन समितीच्या श्रीमती चव्हाण, सह आयुक्त व इतर अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (३०-०६-२०२५) :** (१) व (२) होय.

(३) सदर प्रकरणी श्रीमती संगिता चव्हाण, तत्कालीन सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपति संभाजीनगर यांच्याविरुद्ध म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम १९८९ च्या नियम ८ खाली दिनांक ३०.०४.२०२५ रोजीच्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुक्ताईनगर (जि.जळगांव) तालुक्यातील काही गावे १००% आदिवासी असतानाही अभिलेख्यांमध्ये आदिवासी बाह्य गावे नोंद करण्यात आल्याबाबत

**(२८) ३९७६ (२७-०४-२०२५). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगांव) तालुक्यातील मधापुरी, राजूरा पावरीवाडा, जोंधनखेडा, लालगोटा, हलखेडा, धुळे पावरीवाडा या सर्व गावांची नोंदी शासकीय अभिलेखातील चुकीमुळे वा तांत्रिक अडचणीमुळे १००% आदिवासी असतानाही आदिवासी बाह्य गावांची नोंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे या आदिवासी गावांना विविध योजनांचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गावांचा समावेश आदिवासी गावे म्हणून करण्याची मागणी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आदिवासी विकास विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (२७-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

मुक्ताईनगर तालुक्यातील मधापुरी (चाराठाणा), जोंधनखेडा, लालगोटा, हलखेडा या गावांना शबरी घरकुल योजना, रस्ते, पेवरब्लॉक, भूमीगत गटारी, संरक्षण भिंत इत्यादी योजनांचा लाभ आदिवासी विकास विभागामार्फत देण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्नाधीन गावांचा समावेश आदिवासी उपयोजना क्षेत्रात करण्याबाबत मा. लोकप्रतिनिधीकडून मागणी करण्यात आली आहे. तथापि, सदर गावे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वातील निकष पूर्ण करु शकत नसल्याने सदर गावांचा समावेश अनुसूचित क्षेत्रामध्ये करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्तावित करण्यात आलेले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाशिम जिल्ह्यात कार्बन डायऑक्साईड (सीओटू) उत्सर्जन कमी करणाऱ्या संकल्पना अंमलात आणण्याबाबत

**(२९) ४३४३ (२५-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यात कार्बन डायऑक्साईड (सीओटू) उत्सर्जन कमी करण्यासाठी येथील एक लाख एकर शेती सेंद्रिय व नैसर्गिक पिकांच्या लागवडीखाली आणण्याचे उद्दीष्ट वगळण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याद्वारे हवेतील कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन कमी करुन शेतकऱ्यांना "कार्बन क्रेडिट" चा लाभ मिळवून देण्यात येणार आहे तसेच ही संकल्पना काही वर्ष उलटूनही येथे प्रत्यक्षात येऊ शकलेली नाही, हे ही खरे

आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने माहिती घेऊन सदरील संकल्पना अंमलात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (१४-०५-२०२५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही. वाशिम जिल्ह्याला एक लाख एकर शेती सेंद्रीय व नैसर्गिक पिकाच्या लागवडीखाली आणण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले नाही. शासनाच्या सेंद्रिय व नैसर्गिक शेतीच्या विविध योजनांमधून तयार झालेले शेतकरी गट व स्वेच्छेने सेंद्रिय नैसर्गिक शेती करणारे शेतकरी यांना कार्बन क्रेडीट मिळविण्यासाठी ऑरगॅनिक लेजर या खाजगी कंपनीने शेतकरी गटांसमोर रब्बी-२०२४ मध्ये सदर संकल्पना मांडली होती. कार्बन क्रेडीट मिळविण्याच्या दृष्टीने सेंद्रिय व नैसर्गिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन व नोंदणीसाठी सहाय कृषी आयुक्तालयाकडून करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात रासायनिक खतांच्या किंमती यापूर्वी जास्त असूनही खत उत्पादक कंपन्यांनी केलेल्या दरवाढीबाबत

**(३०) ४५२२ (२८-०४-२०२५) श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रासायनिक खतांच्या किंमती यापूर्वीच जास्त असूनही खत उत्पादक कंपन्यांनी दिनांक १ जानेवारी, २०२५ पासून दरवाढ जाहीर केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दरवाढीनुसार रासायनिक खतांच्या किंमतीत कमीत कमी २०० ते ३०० रुपयांची वाढ होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापूर्वीच शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांना योग्य बाजारभाव मिळत नसल्याने आर्थिक अडचणींना सामना करावा लागत असून या दरवाढीमुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर दरवाढीबाबत फेरविचार करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (१९-०६-२०२५) :** (१), (२) व (३) पारादीप फॉस्फेट लि. (PPL), इंडियन फार्मर्स फर्टिलायझर को-ऑपरेटिव्ह (IFFCO), महाधन ॲग्रिटेक लि. (महाधन STL) या ३ कंपन्यांच्या संयुक्त खतांच्या N:P:K १०:२६:२६ व N:P:K १२:३२:१६ या ग्रेडच्या किंमतीमध्ये माहे जानेवारी २०२५ पासून प्रती गोणी २५५/- रुपयांपर्यंत वाढ झाली आहे. तर MOP खताच्या किंमतीत मागील वर्षाच्या तुलनेत प्रति गोणी रु.१०० ते रु.१५० पर्यंत घट झाली आहे.
(४) केंद्र शासनाच्या अन्नद्रव्याधारित अनुदान योजनेखाली रासायनिक खतांच्या विक्री किंमती ठरविण्यास संबंधित खत कंपन्यांना मुभा दिलेली आहे. युरिया खतांचे दर केंद्र शासनाकडून निश्चित केले जातात. अनुदानित खतांच्या किंमती कमी व्हाव्यात यासाठी खतांच्या किंमती वरील GST माफ करण्याबाबत केंद्र शासनास दिनांक

११.०२.२०२५ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आचरा-डोंगरेवाडीतील शेतजमिनीत खाडीचे पाणी आत आल्यामुळे शेतीचे नुकसान झाल्याबाबत

**(३१) ४५२५ (२८-०४-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आचरा-डोंगरेवाडी भागातील खाजण सदृश भागाच्या खार बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम सुरु असताना एका झडपेची झाकणे काढल्याने शेतजमिनीत खाडीचे पाणी आत आल्यामुळे शेतीचे नुकसान झाल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उन्हाळी शेतीसह शेतजमिनीत खाडीचे खारे पाणी शिरल्यामुळे शेकडो एकर शेतजमीन बाधित झाल्याने माडबागायतीचेही नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खाडीचे खारे पाणी विहीरीत गेल्यामुळेही पाणी दूषित होण्याची शक्यता निर्माण झाली असून याबाबत ग्रामस्थांनी शेतजमिनीची नुकसान भरपाई व पिण्याचे पाणी पुरविण्याबाबत खारभूमी व विकास अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत तोडगा न काढल्यास कणकवली कार्यालयासमोर ग्रामस्थांनी उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (२७-०६-२०२५) :** (१) उघाड्यांची झडपे बसविण्याचे काम सुरु असताना अचानक आलेल्या नैसर्गिक उधाणमुळे भरतीच्या काळात खाडीचे पाणी शेतीमध्ये गेले होते. तथापि, उधाणाचे पाणी कमी झाल्यावर तातडीने उघाडीच्या झडपा बसवून शेतीचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्यात आली आहे. त्यामुळे ३० हेक्टर इतके प्रापण क्षेत्र सुरक्षित झालेले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अंशत: खरे आहे. शेतक-यांनी त्यावेळी नुकसान झाल्याची तोंडी तक्रार केलेली होती. तथापि, प्रत्यक्ष क्षेत्रिय पाहणी केली असता नुकसान झाल्याचे निदर्शनास आले नाही.
(४) ग्रामस्थांनी कणकवली कार्यालयासमोर उपोषणास बसण्याचा तोंडी इशारा दिला होता. तथापि, उघाडीच्या झडपा बसविण्याचे काम तातडीने पूर्ण करण्यांत आल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आणून देण्यांत आले.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात औद्योगिक वापरासाठी शेतजमीन एनए करण्याची आवश्यकता नसल्याबाबत

**(३२) ४५९९ (२८-०४-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उद्योग उभारणीची अडचण लक्षात घेऊन शासनाने शेतजमीन अकृषिक न करता (एनए) औद्योगिक वापरास सवलत दिली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या सुधारणेनुसार कोणते आदेश जारी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-०५-२०२५) :** (१) होय. हे अंशत: खरे आहे.

"महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२ (अ), (ब), (क) व (ड) व कलम ४४-अ मध्ये सुधारणा करून अकृषिक परवानगीच्या सनदेच्या आवश्यकतेची तरतूद रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. यासाठी काही कालावधी लागणार आहे. यास्तव, सदर कार्यवाही पूर्ण होई पावेतोच्या कालावधीत एखाद्या उद्योग घटकाला औद्योगीक प्रयोजनासाठी बिनशेती वापर सुरू करावयाचा असल्यास अकृषिक वापराकरीता सनद घेण्याची आवश्यकता राहणार नाही. ज्या उद्योग घटकाला औद्योगीक प्रयोजनासाठी बिनशेती वापर सुरू करावयाचा आहे त्यांनी सक्षम नियोजन प्राधिकरणाकडून विकास परवानगी (Development Permission) घेतल्यानंतर किंवा नियोजन प्राधिकरणाकडून बांधकाम आराखडे मंजूर केल्यानंतर त्यांची एक प्रत संबंधीत ग्राम महसूल अधिकाऱ्याकडे अधिकार अभिलेखात योग्य त्या नोंदी घेण्यासाठी सादर करावी. अशी माहिती प्राप्त झाल्यानंतर ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी अधिकार अभिलेखात नोंद घेऊन अधिकार अभिलेख अद्यावत करण्याची कार्यवाही यथाशीघ्र पूर्ण करावी." अशा आशयाचे शासन परिपत्रक क्र.एनएपी-२०२४/प्र.क्र.१८०/ज-१अ, दिनांक २९/०१/२०२५ शासाकडून निर्गमित करण्यात आले आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

राज्यातील निवासी, वाणिज्य आणि औद्योगीक वापर असणाऱ्या इमारतीखालील जमिनीवरील संपूर्ण अकृषिक कर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करण्याबाबबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दत्त देवस्थान धाकटेदेवघर (ता.अंबाजोगाई, जि.बीड) या देवस्थानच्या मालकीच्या इनाम जमिनीचे संरक्षण करुन त्याचे अस्तित्व टिकविण्याबाबत

**(३३) ४६५८ (२७-०४-२०२५). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दत्त देवस्थान धाकटेदेवघर (ता.अंबाजोगाई, जि.बीड) या देवस्थानच्या मालकीच्या सशर्त सेवा इनाम जमिनीचे संरक्षण करून त्याचे अस्तित्व टिकविण्याबाबत श्री.चिंतामणी यशवंत गोस्वामी अर्चक इनामदार यांनी दिनांक २७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०७-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) मौजे अंबाजोगाई येथील स.नं.३२७ क्षेत्र २६ एकर २५ गुंठे जमीन तत्कालीन उपजिल्हाधिकारी (सा.), बीड यांचे दिनांक ०८.०३.२०१८ रोजीच्या आदेशान्वये श्रीधर योगीराज गोस्वामी व इतर यांना प्रतिबंधीत मालकी व कब्जाहक्काने घोषित करण्यात आली आहे. त्यानुसार फेरफार क्रमांक २७६१९ नोदंविण्यात आल्याचे दिसून येते. तद्नंतर उपजिल्हाधिकारी (सा.), बीड यांचे दिनांक ०९.०९.२०२१ रोजीच्या आदेशान्वये गोस्वामी व इतर तीन प्रतिबंधित मालकी क्षेत्रधारकांचे अर्जावरुन सदरचे भोगवटादार वर्ग-२ मधून भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्याबाबतचे आदेश पारित करण्यात आले आहेत. तसेच उपजिल्हाधिकारी (सा.), बीड यांच्या दिनांक ०४.०९.२०१९ रोजीच्या आदेशान्वये जमीन विक्री संदर्भात पडताळणी प्रमाणपत्र दिले आहे. त्यानुसार फेरफार क्रमांक २८०२१, २८०४१, २५०५८, २८०१२ नोंदविण्यात आला असून पुढे खरेदी विक्री व्यवहार झाल्याचे दिसून येते.

स.नं.३३५/१ मध्ये मा.न्यायालयाच्या आदेशानुसार व धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद यांच्या निकालाआधारे तर स.नं.३३५/२ मध्ये धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद यांच्या आदेशानुसार श्री.दत्तात्रय संस्थान धाकटे देवघर अर्चक यशवंत S/O सर्वज्ञ यांचे नाव कमी झाल्याचे दिसून येते.

मौ. डिघोळअंबा येथे श्री दत्त मंदिर देवस्थान धाकटे देवघर यांच्या नावे जवळपास ३५ गटामध्ये जमीन असून त्यापैकी गट नं. ३८३ व गट नं. ४१० मधील एकूण क्षेत्र अनुक्रमे ०९ हे. ५१ आर क्षेत्र देवस्थानचे नाव कमी करुन खाजगी मालकीचे करण्यात आलेले आहे. सदर हस्तांतरण तत्कालीनउपजिल्हाधिकारी यांच्या दिनांक ०७.०३.२०१८ रोजीच्या आदेशान्वये करण्यात आले आहे. त्यानुसार देवस्थानचे नाव कमी करुन चंद्रकांत त्रिंबकराव गोस्वामी व वामन त्रिंबकराव गोस्वामी यांच्या नावे प्रतिबंधित मालकी क्षेत्र फेरफार क्र. १३२१ अन्वये नोंदविण्यात आले आहे.

तद्नंतर तत्कालीन उपजिल्हाधिकारी (सा.), बीड यांनी दिनांक २९.१०.२०२० रोजीच्या आदेशान्वये प्रतिबंधित मालकी क्षेत्रधारकांना सदरचे क्षेत्र विक्री करण्याची परवानगी दिलेली आहे व त्यानंतर दोन्ही गटांत प्रतिबंधित मालकीने इतर खातेदारांच्या नावे खरेदीखताआधारे हस्तांतरीत झाल्याचे दिसून येते.

तथापि, अपर जिल्हाधिकारी, बीड व अपर जिल्हाधिकारी, अंबेजोगाई यांच्या द्विसदस्यीय समितीच्या अहवालानुसार, प्रस्तुत प्रकरणात विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना पुननिरिक्षण करण्याचे शासनाने दिनांक ०५.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये निर्देश दिलेले असून त्यांच्याकडून पुननिरिक्षण प्रक्रिया सुरु आहे. पुर्ननिरिक्षणाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर या जमिनीसंदर्भात यथोचित कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औसा (जि.लातूर) येथील सामाजिक वनीकरण व शासकीय देवस्थानच्या जमिनीत वृक्ष लागवड करण्याबाबत

**(३४) ४८०८ (२५-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) येथील एकंबी व इतर वन विभागाच्या शासकीय जमिनीत देवस्थानच्या खुल्या जमिनीत घनवन लागवड व पर्यटन केंद्र म्हणून उद्यान विकसित करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी यांना माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान आढावा बैठकीत केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सामाजिक वनीकरण विभागाचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वन विभागाच्या एकूण किती क्षेत्रावर वृक्ष लागवड करण्यात आली आहे,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उर्वरित क्षेत्रावर निधीची तरतुद करुन वृक्ष लागवड व पर्यटन केंद्र म्हणून उद्यान विकसित करण्याच्या प्रस्तावाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२५-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) या संदर्भात शासन नियम व प्रचलित कार्यपद्धतीनुसार प्रस्तावाची तपासणी करण्याबाबतच्या सूचना वन विभाग, लातूर यांना देण्यात आल्या आहेत.
(३) मौजे एकंबी येथे वन विभागाचे एकूण तीन गट असून सदर गटात वन विभागाचे ३९.३८ हे क्षेत्र आहे. सदर क्षेत्रावर सन २०१८ व २०२१ मध्ये ३८,८०० रोपवनाची लागवड करण्यात आली आहे.
(४) याबाबत प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावाची तपासणी करून प्रचलित कार्यपद्धतीनुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात चिखली, गोंदिया व भंडारा जिल्ह्यासह मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेचा प्रलंबित निधी शेतकऱ्यांना मिळण्याबाबत

**(३५) ४९९१ (२७-०४-२०२५). श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील चिखली (बुलढाणा) गोंदिया व भंडारा जिल्ह्यात सन २०१९-२० पासून पात्र शेतकऱ्यांना मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत पूरक अनुदान प्राप्त झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजनेंतर्गत शेतकऱ्यांना मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेचे पूरक अनुदान देण्यात येत असून या योजनेचे सन २०२२-२०२३ या वर्षातील एकूण रु.६६,९१,२२१ रक्कम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५ टक्के अनुदानास २५ टक्के पूरक अनुदान असे ८० टक्के व ४५ टक्के अनुदानास ३० टक्के पूरक अनुदान असे ७५ टक्के अनुदान दिले जातात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन या योजनेंतर्गत पूरक अनुदान शेतकऱ्यांना त्वरित मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (१६-०६-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना सन २०२२-२३ या वर्षामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यामधील एकही लाभार्थी प्रलंबित नाही, सर्व लाभार्थ्यांना अनुदान वितरित करण्यात आलेले आहे.

गोंदिया जिल्ह्यामधील सन २०१९-२० ते २०२४-२५ मधील सर्व पात्र ६८८ लाभार्थ्यांना रु.१.२४ कोटी

निधी वितरित करण्यात आलेला आहे.

भंडारा जिल्ह्यातील सन २०२०-२१ ते २०२३-२४ मधील ७९८ लाभार्थ्यांना रु.१.२१ कोटी निधी वितरित करण्यात आलेला आहे व ३ शेतकऱ्यांच्या अनुदानाची सुधारित परिगणना झाल्यावर अनुदान अदा करण्यात येणार आहे.

(३) व (४) होय.

मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजने अंतर्गत शासनाकडून वेळोवेळी अनुदान वितरीत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विदर्भात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत शेतकरी नागरिकांचा (पोकरा-२) योजनेत अंतर्भाव करुन शेतकऱ्यांना लाभ देण्याबाबत**

**(३६) ५०७३ (२५-०४-२०२५). श्री.रवी राणा (बडनेरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा

(१) विदर्भात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा-१) टप्पा समाविष्ट असलेल्या गावांतील अत्यल्प शेतकऱ्यांनी लाभ घेतला तसाच नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा-२) टप्पा या योजनेत शेतकरी लोकांचा अंतर्भाव करुन शेतकऱ्यांना लाभ देण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळून त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० व ११ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व मा.कृषी मंत्री महोदय तसेच मुख्य सचिव (महाराष्ट्र शासन) यांचेकडे पत्र पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त पत्राच्या अनुषंगाने निर्णय घेण्याकिरता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (२५-०६-२०२५) :** (१) प्रकल्प टप्पा-१ मध्ये समाविष्ट असलेल्या गावांचा प्रकल्पाच्या टप्पा-२ मध्ये समावेश करण्यात आलेला नाही. कृषी व पदुम विभागाच्या शासन निर्णय दिनांक १४.१०.२०२४ अन्वये निवड करण्यात आलेल्या ७२०१ गावांतील शेतक-यांना विहीत निकषांनुसार प्रकल्पाच्या ऑनलाईन प्रणालीवर अर्ज केल्यानंतर प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत विविध घटकांचा लाभ दिला जाणार आहे.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे पत्र प्राप्त झाले आहे.

(३) नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राबविण्यात येत आहे. मर्यादित आर्थिक संसाधने विचारात घेता, अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ देण्याच्या उद्देशाने प्रकल्पाच्या टप्पा-१ मध्ये लाभ मिळालेल्या गावांचा प्रकल्पाच्या टप्पा-२ मध्ये समावेश करण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भडगांव व पाचोरा (जि.जळगांव) येथे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (यावल) या कार्यालयाचे उपकार्यालय नव्याने सुरु करण्याबाबत**

**(३७) ५३६८ (२७-०४-२०२५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगांव व पाचोरा (जि.जळगांव) येथे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (यावल) या कार्यालयाचे उपकार्यालय नव्याने सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदन सादर होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदन दिल्यानंतर तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांनी प्रस्ताव सादर करण्याचे आदेश सचिव, आदिवासी विकास विभाग यांना दिनांक २ डिसेंबर, २०२३ रोजी आदेश दिले होते तसेच मा.आयुक्त, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनाही दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास पत्र दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रस्ताव सादर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (३०-०६-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) प्रकल्प कार्यालय, यावल चे उपकार्यालय भडगांव येथे नव्याने निर्माण करण्यासाच्या अनुषंगाने पदनिर्मितीस मंजूरी देण्यासाठी नस्ती वित्त विभागास करण्यात आली होती. सदर प्रकरणी वित्त विभागाने उपस्थित केलेल्या त्रुटींची पूर्तता करुन नस्ती पुन:श्च वित्त विभागास सादर करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## भडगांव (जि.जळगांव) येथे आदिवासींच्या ७५ विद्यार्थ्यांकरिता शासकीय वसतीगृह मंजूर होण्याबाबत

**(३८) ५३६९ (२७-०४-२०२५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भडगांव (जि.जळगांव) येथे आदिवासींच्या ७५ विद्यार्थ्यांकरिता शासकीय वसतीगृह मंजूर होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या लेखी निवेदनाच्या अनुषंगाने अप्पर मुख्य सचिव, आदिवासी विकास विभाग यांना प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त प्रस्ताव सादर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (२७-०६-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे. याबाबतचे मा.लोकप्रतिनिधींचे दिनांक २०.०९.२०२४ रोजीचे निवेदन विभागास प्राप्त झाले आहे.
(२) सदर प्रकरणी आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांच्याकडून दिनांक २०.०५.२०२५ रोजी प्रस्ताव प्राप्त झाला असून, सदर प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करण्याचा मा.सर्वोच्च न्यायालने दिलेल्या निवाडयाबाबत**

**(३९) ५३८६ (२९-०४-२०२५). श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करुन मागासलेपणाच्या आधारे त्यांच्या जाती स्तरांचे आरक्षण निश्चित करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा निर्णय राज्यात लागू करण्यासंदर्भात दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी मा.उच्च न्यायालयाचे निवृत्ती न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने आपला अंतिम अहवाल शासनाला सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अहवालातील ठळक मुद्दे काय आहेत, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (०५-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दिनांक १५.१०.२०२४ अन्वये राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याच्या दृष्टीने शासनास प्रारुप आराखडा सादर करण्यासाठी मा.श्री.अनंत मनोहर बदर, निवृत्त न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीस ३ महिन्याचा कालावधी निश्चित करण्यात आला होता. सदर कालावधी दिनांक १४.०१.२०२५ रोजी संपुष्टात आल्यामुळे सदर समितीस शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दिनांक ०४.०३.२०२५ अन्वये आठ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर समितीचा अहवाल शासनास अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यामध्ये प्रकल्प संचालक (आत्मा) कार्यालयांतर्गत**
**अनुदान वाटप न झाल्याबाबत**

**(४०) ५४०८ (२७-०४-२०२५). श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यामध्ये प्रकल्प संचालक (आत्मा) कार्यालयांतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात अनुदान वाटप न झाल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय, (२) असल्यास, यासंदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई न करता कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर जबाबदारी देऊन कारवाई करुन प्रकरण बंद करण्याचा प्रयत्न केला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन प्रश्न भाग १ व २ बाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (०१-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड येथील प्रभारी तहसीलदार यांनी विविध कामांमध्ये केलेली अनियमितता**

**(४१) ५४३६ (२७-०४-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड येथील नायब तहसिलदार श्री.डोके यांच्याकडे प्रभारी तहसीलदार पदाचा अतिरिक्त कार्यभार असतानाही महसूल विभागाचा कार्यभार असल्याने त्यांच्याकडे सामान्य नागरिक व शेतकरी विविध कामासाठी येत असतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागरिकांच्या असलेल्या संचिका वा महसूली प्रकरणामध्ये मोठया प्रमाणात पैशाची मागणी करणे, तक्रारदार व फिर्यादी यांच्याकडून वेगवेगळ्या पद्धतीने पैसे गोळा करणे आर्थिक मागणी पूर्ण न झाल्यास नागरिक व शेतकऱ्यांना अर्वाच्च भाषेत त्यांचा अपमान करणे अशा घटना घडत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बीड येथील नायब तहसिलदार श्री.डोके यांच्याकडे सन २०२१-२२ या कालावधीमध्ये तहसीलदार पदाचा अतिरिक्त कार्यभार असताना महसूल प्रकरणे, संजय गांधी निराधार योजनेची प्रकरणे, पुरवठा विभाग, गौण खनिज व तहसील कार्यालयातील असलेले सर्वप्रकारची संलग्न कामे या सर्व प्रकरणामध्ये आर्थिक बाबी ठरवून अनियमितता केली असून गौण खनिजामध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार केला असून त्यांच्या काळात झालेल्या सर्व संचिकेची स्तरनिहाय व खातेनिहाय चौकशीची मागणी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विभागाकडे पत्राद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १५०/४ नुसार मौजे बीड येथील फेरफार क्र.८३०७ व ८३११ यामधील सर्व्हेमध्ये नियमबाहय फेरफार होवू नये म्हणून श्री.डोके यांनी एकतर्फी निर्णय घेत व आक्षेप अर्ज घेणाऱ्याला पुर्व सूचना न देता प्रतिवादी यांच्याकडून आर्थिकबाबीमध्ये सहकार्य होताच अनियमितता करत निकाल देऊन टाकला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, त्यांच्या कालावधीतील सर्व प्रकरणाची पुनर्तपासणी करुन शासनस्तरावरून अथवा त्रयस्त समितीमार्फत होण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.

श्री.डोके, नायब तहसिलदार यांचेकडे सन २०२१-२२ मध्ये दिनांक २२ सप्टेबर, २०२१ ते दिनांक ५ मार्च, २०२२ या कालावधीमध्ये बीड तहसीलदार पदाचा अतिरीक्त कार्यभार होता.

मा.श्री.संदिप क्षिरसागर, मा.विधानसभा सदस्य, बीड यांच्या दिनांक १६.१०.२०२२ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड कार्यालयाच्या पत्र दिनांक २९.१०.२०२२ व दिनांक २२.११.२०२२ नुसार उपविभागीय अधिकारी, बीड यांना चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठी कळविण्यात आले होते. त्यानुसार तत्कालीन उपविभागीय अधिकारी, बीड यांनी चौकशी करून दिनांक १७.१२.२०२२ रोजी अहवाल सादर केला. सदर अहवालान्वये, या कालावधीमध्ये कोणतीही अनियमितता झाली नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.
(४) हे खरे नाही.
सदर प्रकरणातील तक्रारदारास म्हणणे मांडण्यासाठी/लेखी सादर करण्यासाठी पुरेशा संधी देण्यात आल्या आहेत.
(५) होय, हे खरे आहे.
तत्कालीन उपविभागीय अधिकारी, बीड यांचेमार्फत चौकशी पूर्ण करण्यात आली.

मा.विधानसभा सदस्य यांचे मागणीप्रमाणे श्री.डोके नायब तहसिलदार यांचेकडे देण्यात आलेला तहसीलदार पदाचा पदभार दिनांक ५.९.२०२३ चे आदेशान्वये इतर अधिकारी यांचेकडे देण्यात आलेला आहे.
(६) याप्रकरणी तत्कालीन उप विभागीय अधिकारी, बीड यांचेकडून चौकशी पूर्ण करण्यात आलेली आहे.

---

## शेंडा पार्क (ता.करवीर, जि.कोल्हापूर) आर.के. येथे नवीन कृषी भवन इमारत बांधकामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत

**(४२) ५९६८ (२५-०४-२०२५). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेंडा पार्क (ता.करवीर, जि.कोल्हापूर) आर.के. नगरजवळील गट नं.६०४ मधील नवीन कृषी भवन इमारत बांधकामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कृषी मंत्री महोदयांना नुकतेच दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (०२-०६-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) शेंडा पार्क येथे कृषी भवन इमारत व इतर इमारतींचे बांधकामाच्या प्रस्तावास मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील सचिव समितीची मान्यता प्राप्त झाली असून, सचिव समितीने प्रस्तावातील नियोजित नकाशांना उप मुख्य वास्तुशस्त्रज्ञ, महाराष्ट्र शासन, पुणे यांची मान्यतेच्या अधीन राहुन मान्यता दिलेली आहे.

शासन पत्र दिनांक ०७.०४.२०२५ अन्वये आयुक्त (कृषी) यांना प्रस्तुत प्रकरणी प्रस्तावातील नियोजित नकाशांना उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांची मान्यता घेऊन सदर प्रमाणित केलेली प्रत शासनास सादर करण्याबाबत कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कटोल (जि.नागपूर) येथील कृषी विभागात जीर्ण झालेल्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाबाबत

**(४३) ५९८६ (२५-०४-२०२५). श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कटोल (जि.नागपूर) येथील कृषी विभागाची प्रशासकीय इमारत जीर्ण झाली असून मोडकळीस आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसह कामानिमित्त ये-जा करणाऱ्या शेतकऱ्यांना जीव मुठीत घेऊन काम करावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कृषी विभाग कार्यालयासाठी नवीन प्रशासकीय इमारत बांधण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कृषी मंत्री महोदयांकडे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन लेखी निवेदनेच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (२७-०५-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

कृषी विभागाचे उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी व ३ मंडळ कृषी अधिकारी कार्यालये कार्यरत असून तालुका कृषी अधिकारी, हे काटोल कार्यालय हे प्रशासकीय इमारत तहसिल कार्यालय, काटोल येथे सन २०१८ पासून स्थलांतरित झालेले आहे. तसेच उपविभागीय कृषी अधिकारी, काटोल हे कार्यालय सन २०१४ पासून भाडयाच्या इमारतीत कार्यरत आहे.
(३) व (४) हे खरे आहे.

काटोल जि.नागपूर येथे तालुका कृषी अधिकारी, काटोल व अधिनस्त कार्यालयाकरीता नवीन इमारतीच्या बांधकामासाठी निश्चित करण्यात आलेली जागा नगरपरिषद, काटोल यांचेकडून कृषी विभागास हस्तांतर करुन घेण्याबाबत, नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करुन तद्नंतर इमारत बांधकामाचा परिपूर्ण प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास करण्याबाबत आयुक्त कार्यालयास दिनांक १२.०३.२०२५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी येथे जिल्हा कृषी अधीक्षक व अधिकारी कार्यालयातील विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४४) ६००२ (२५-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी येथे जिल्हा कृषी अधीक्षक व अधिकारी कार्यालयातील मंजूर असलेले ६४० पदांपैकी विविध संवर्गातील एकूण १६९ पदे मागील काही महिन्यांपासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिक्त पदांमुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात विविध योजनेसंदर्भात मार्गदर्शन व लाभ मिळण्यास अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन रिक्त पदे तातडीने भरण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (२७-०५-२०२५) :** (१) हे खरे आहे.

आकृतीबंधानुसार परभणी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयांतर्गत गट-अ ते गट-ड संवर्गाची ६४९ पदे मंजूर असून त्यापैकी ४८२ पदे भरलेली आहेत तर १६७ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

कृषी विभागामार्फत जिल्हयात राबविल्या जाणाऱ्या योजनांसंबंधित कामे प्रामुख्याने कृषी सहायक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांच्यामार्फत करण्यात येतात. रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त पदभार नजीकच्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडे सोपवून शेतकऱ्यांना योजनांबाबत मार्गदर्शन व लाभ दिला जात आहे.

(३) महाराष्ट्र कृषी सेवा गट-अ संवर्गातून महाराष्ट्र कृषी सेवा गट-अ अधिक्षक कृषि अधिकारी संवर्गात निवडसूची २०२४-२५ करीता पदोन्नतीने भरणेबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे.

महाराष्ट्र कृषी सेवा गट-अ व गट-ब संवर्गातील सरळसेवा कोटयातील निवडसूची २०२४-२५ करीता लोकसेवा आयोगास २५८ पदांचे मागणीपत्र सादर करण्यात आले असून सदर पदांचे पूर्व परीक्षा माहे-डिसेंबर मध्ये झाली आहे.

तसेच, सन २०२५ चे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्याकरीता महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब व गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील सरळसेवा कोटयातील ८७ पदांस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडील उप समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी येथे तूर व सोयाबीन या पिकांकरिता पिक स्पर्धा घेऊनही शेतकऱ्यांना बक्षिस वितरण न केल्याबाबत

**(४५) ६००७ (२५-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाकडून खरीप हंगाम २०२३ मध्ये तूर व सोयाबीन या पिकांकरिता पिक स्पर्धा घेऊन सर्वाधीक उत्पन्न घेणाऱ्या शेतकऱ्यांना अनुक्रमे १०, ७ व ५ हजार रक्कम व प्रशास्तीपत्र देण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पीक स्पर्धेचा निकाल लावून कालावधी उलटून गेला तरीही अद्याप विजेत्यांना बक्षिसे देण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन पिक स्पर्धा घेऊन बक्षिस वितरण न करता शेतकऱ्यांची दिशाभूल करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (२९-०५-२०२५) :** (१) हे खरे आहे .

(२) हे खरे नाही.

(३) पिकस्पर्धा खरीप हंगाम २०२३ मध्ये सोयाबीन व तूर पिकांसाठी जिल्हास्तरावर परभणी येथील ६ शेतकऱ्यांची विजेता म्हणून निवड करण्यात आलेली होती. त्यातील ५ विजेत्या शेतकऱ्यांना माहे, डिसेंबर, २०२४ व जानेवारी, २०२५ असे दोन हप्त्यात बक्षिसाची रक्कम अदा करण्यात आलेली आहे. तसेच, उर्वरित १ शेतकऱ्याच्या पे-रजिस्ट्रेशन मध्ये तांत्रिक अडचण उद्भवली होती. सदर अडचण दूर करुन दिनांक ४/३/२०२५ रोजी बक्षीस रक्कम

त्याच्या खात्यावर वर्ग करण्यात आलेली आहे. सर्व ६ विजेत्यांना बक्षिसाची रक्कम अदा करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात भोगवटादार वर्ग-२ चे रुपांतर वर्ग-१ मध्ये करुन शर्तभंगाचा नजराणा एकाच वेळी भरण्याबाबत

**(४६) ६०१२ (२४-०५-२०२५). श्री.कैलास घाडगे पाटील (धाराशिव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात इनाम जमिनीच्या मदतमाश या प्रकारात भोगवटादार वर्ग-२ जमिनीचे रुपांतर वर्ग-१ मध्ये करण्यासाठी शर्तभंग नजराणा ५% इतका घेण्याबाबतचे विधेयक दिनांक १७ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास विधानसभा सभागृहात मांडण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विधेयकाच्या चर्चेदरम्यान लोकप्रतिनिधी यांनी एकाच जमीनीचे हस्तांतर वांरवार झाले असल्यास जेवढ्या वेळेस शर्तभंग झाला असेल तेवढ्या वेळेस नजराणा रक्कम भरावी लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जमिनीचे हस्तांतर कितीही वेळा झाले तरी शर्तभंगाची नजराणा रक्कम एकाच वेळी भरुन घ्यावी, अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी केली होती व यावर मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी आश्वासित केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबतचा शासन निर्णय अद्यापपर्यंत महसूल विभागाकडून निर्गमित करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन भोगवटादार वर्ग-२ चे रुपांतर वर्ग-१ मध्ये करताना संबंधितांकडून शर्तभंगाचा नजराणा एकाच वेळी भरण्याबाबतचा निर्णय निर्गमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०६-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) (३) व (४) शासन राजपत्र दिनांक ०१ जानेवारी, २०२५ अन्वये हैद्राबाद इनाम निर्मूलन व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत अधिनियम १९५४ च्या कलम २(ए) व कलम 6 मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. याअधिनियमाअंतर्गत येणाऱ्या मदतमाश जमीनी भोगवटदार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्यासाठी/कृषीतर प्रयोजनासाठी करण्यात आलेली हस्तांतरणे नियमित करणेसाठी ५०% ऐवजी ५% इतकी नजराणा रक्कम आकारण्यात यावे व लागू असलेल्या प्रकरणी दंडाच्या रकमेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

मदतमाश जमीनीच्या प्रकरणी परवानगी शिवाय हस्तांतरण / वापरात बदल केला असल्यास शेवटचा शर्तभंग हाच एकमेव शर्तभंग समजून अशी प्रकरणे शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक जमीन-२०२२/प्र.क्र.१०६/ज१, दिनांक ५ जूलै २०२३ मधील तरतूदीनुसार नियमानुकुल करण्यासाठी शासनास सादर करण्यात याव्यात अशा सुचना शासन परिपत्रक दिनांक ०३.०३.२०२५ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## राज्यात आदिवासी तसेच पारधी समाजासाठी पेसा अंतर्गत असलेल्या विविध योजना धाराशिव जिल्ह्यातील समाजासाठी राबविण्याबाबत

**(४७) ६०१३ (२७-०४-२०२५). श्री.कैलास घाडगे पाटील (धाराशिव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी, महादेव कोळी तसेच पारधी समाजाच्या विकासासाठी व शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, रस्ते, वीजपुरवठा, घरकुल यासारख्या मुलभूत गरजा व सोयी सुविधा पुरविण्यासाठी पेसा अंतर्गत विविध प्रकारच्या राज्यस्तरिय योजना कार्यान्वित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समाजाच्या विकासासाठी मुलभूत सोयी सुविधा पुरविणे हे इतर योजनेतून शक्य होत नसल्याने हा समाज मागास राहिला आहे तसेच पेसा अंतर्गत विविध योजना धाराशिव, कळंब व वाशी तालुक्यातील महादेव कोळी व पारधी समाजासाठी राबविणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही योजना राबविण्याबाबत तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन पेसा अंतर्गत असलेल्या विविध योजना धाराशिव जिल्ह्यातील समाजाकरिता राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (२७-०६-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) पेसा क्षेत्रासाठी एकुण लोकसंख्येच्या किमान ५० टक्के लोकसंख्या ही अनुसूचित जमातीची असणे आवश्यक आहे. धाराशिव, कळंब व वाशी तालुक्यातील अनुसूचित जमातीची लोकसंख्या प्रमाण सन २०११ जनगणनेनुसार अनुक्रमे २.१५ ,२.६ व २.१५ टक्के एवढी आहे. सदर तालुक्यांतील आदिवासी समाजासाठी इतर अनुज्ञेय योजनांमधून वैयक्तिक तसेच सामूहिक लाभ देण्यात येतात.

५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पिंपळखुटी (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील मंजूर रासायनिक खत रॅक पॉईंट कार्यान्वित करुन शेतकऱ्यांना खत उपलब्ध होण्याबाबत

**(४८) ६१२३ (२५-०४-२०२५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळखुटी (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथे रासायनिक खतांसाठी रॅक पॉईंट मंजूर असूनही खत कंपन्या तेथे रॅक लावण्यास तयार नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रॅक पॉईंट कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना वेळेवर व मुबलक प्रमाणात खत उपलब्ध होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (३०-०५-२०२५) :** (१) होय.

(२) व (३) मुख्य प्रबंधक, मध्ये रेल्वे विभागीय कार्यालय, नागपूर यांना जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी पिंपळखुटी रेक पॉईंट वर सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत दिनांक १९/०४/२२ च्या पत्रान्वये कळविले आहे. आयुक्त (कृषी)

यांनी दिनांक १८.०५.२०२३ तसेच शासनाने दिनांक २१.०५.२०२४ व २४.०७.२०२४ च्या पत्रान्वये रेल्वे रेक पॉइंट सुरु करण्याबाबत केंद्र शासनाच्या रेल्वे विभागास विनंती केली आहे.

सद्यस्थितीमध्ये यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना धामनगाव जिल्हा अमरावती, नांदेड व वाशिम या इतर जिल्ह्यातील रेल्वे रेक पॉईंटवरुन खताचा पुरवठा जिल्ह्यातील खत विक्रेत्यांमार्फत केला जातो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भामरागड (जि.गडचिरोली) येथे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे तत्कालीन प्रकल्प अधिकारी यांनी दुधाळ गाय वाटप योजनेत केलेला गैरव्यवहार**

**(४९) ६९८४ (२८-०४-२०२५). डॉ.मिलिंद नरोटे (गडचिरोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामरागड (जि.गडचिरोली) येथे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प सन २०२२ ते २०२३ या कालावधीत दुधाळ गाय वाटप योजनेत झालेल्या गैरव्यवहारात तत्कालीन प्रकल्प अधिकारी, श्री.शुभम गुप्ता दोषी आढल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही पिडित आदिवासींनी तत्कालीन प्रकल्प अधिकारी, श्री.शुभम गुप्ता यांच्याविरोधात काही तक्रारी दाखल केल्या असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (०३-०७-२०२५) :** (१), (२) व (३)

श्री.शुभम गुप्ता, तत्कालीन प्रकल्प अधिकारी, भामरागड हे भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी असल्याने त्यांच्याविरूद्ध अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९६९ च्या नियम ८ नुसार कारवाई करण्याचा प्रस्ताव शिफारशीसह व दोषारोपपत्रासह सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात आला. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाद्वारा श्री.शुभम गुप्ता यांचेविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्याच्या अनुषंगाने दिनांक १७ जून,२०२५ रोजी ज्ञापन बजावण्यात आले आहे. तसेच सदर प्रकरणात सहभाग असणाऱ्या आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील कार्यरत उर्वरीत अधिकारी/कर्मचारी यांचेविरूद्धही स्वतंत्ररित्या विभागीय चौकशी या विभागाकडून सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहेरी (जि.गडचिरोली) येथे एकलव्य निवासी शाळेमध्ये अधीक्षकांनी विद्यार्थ्यांना केलेल्या मारहाणीबाबत**

**(५०) ७०६३ (२४-०५-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहेरी (जि.गडचिरोली) येथे एकलव्य मॉडेल निवासी शाळेमधील आदिवासी विद्यार्थ्यांना अधीक्षकाने चप्पलने मारहाण केली व याबाबत चार-पाच विद्यार्थ्यांनी नातेवाईकांना कळविल्यानंतर आदिवासी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी शाळेमध्ये जाऊन दिनांक २७ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास पाहणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील श्री.कुशल जैन, प्रकल्प अधिकारी यांनी चौकशीचे आदेश दिले असता प्रथमदर्शनी अधीक्षक श्री.ईश्वर शेवाळे दोषी आढल्यामुळे त्यांच्या निलंबनाचा प्रस्ताव आयुक्तालयास पाठविला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रस्तावास आयुक्त कार्यालयाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (०१-०७-२०२५) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) श्री. ईश्वर शेवाळे अधिक्षक यांना दिनांक २८.०३.२०२५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.